जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2018
तरुण भारत

# विद्यापीठात उद्या डॉ. वावरे यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दि युनायटेड वेस्टर्न बँकेचे कै. आर. एन. गोडबोले अध्यासन व देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार ११ रोजी सकाळी ९.३० वाजता व्याख्यानाचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिल के. वावरे हे "वित्तीय क्षेत्रातील वर्तमान अंस्वस्थता"" या विषयावर व्याख्यान देणार आहेत. अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी आहेत. तर प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. तरी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 55 वा वार्षिक दीक्षान्त समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

Estd : 1962
NAAC 'A' Grade

- शिवाजी विद्यापीठाचा 55 वा दीक्षान्त समारंभ साधारणपणे डिसेंबर 2018 ते जानेवारी 2019 दरम्यान नियोजित आहे
- ऑक्टोबर 2017 व एप्रिल 2018 सत्रातील आणि **यापूर्वीच्या** अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी /पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन आणि खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये विहित नमुन्यासह पदवी प्रमाणपत्र मागणीकरिता दीक्षान्त अर्ज करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| **1** | **13 ऑगस्ट 2018 ते 12 सप्टेंबर, 2018 पर्यंत शुल्क** | **रू.250/—** |
| **2** | **13 सप्टेंबर, 2018 ते 27 सप्टेंबर 2018 पर्यंत विलंब शुल्क** | **रू.350/—** |
| **3** | **28 सप्टेंबर 2018 ते 12 ऑक्टोबर 2018 पर्यंत अतिविलंब शुल्क** | **रू 850/—** |

- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज (Convocation Application) www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन भरून त्याची प्रिंट घ्यावी व अंर्जासोबत आयडेंटीटी साईज दोन फोटो,आधारकार्डची सत्यप्रत आणि अंतिम वर्षाच्या गुणतक्त्याची प्रमाणित प्रती जोडाव्यात. अर्जामध्ये पत्ता पूर्ण आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी आणि भरलेला अर्ज दीक्षांत विभागात समक्ष अथवा पोष्टाने तात्काळ जमा करावा.

**ऑन लाईन अर्ज भरताना प्रथम वेबसाईटवरील सूचना वाचाव्यात.**

- ज्या परीक्षांचे निकाल जाहीर झालेले आहेत अशा परीक्षांची यादी विद्यापीठ संकेत स्थळावर ठेवण्यात आलेली आहे. त्या परीक्षांचे पदवी प्रमाणपत्र मागणी अर्ज ऑन लाईन प्रोसेस होतील.
- दीक्षान्त अर्ज ऑन लाईन भरताना जे विद्यार्थी 2006 पूर्वी उत्तीर्ण आहेत, त्यांनी स्वतःच्या फोटोची JPEG file अपलोड करून नंतरच अर्ज ऑन लाईन भरावा. सदरचा फोटो पदवी प्रमाणपत्रावर Black & White रंगात छपाई होईल. **विद्यार्थ्यांनी आधारकार्ड नंबर अर्जामध्ये बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.**
- अर्ज भरताना विद्यार्थ्याचा ई—मेल आयडी व भ्रमणध्वनी कमांक नमूद करणे आवश्यक आहे. दीक्षान्त समारंभाचे निमंत्रणपत्र व तपशीलवार माहिती विद्यार्थ्यांना SMS द्वारे कळविण्यात येईल. ऑन लाईन पैसे भरण्यासाठी खालील बॅंकेच्या खात्यावर पेमेंट गेट—वे सुविद्या उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.नं | बॅंकेचे नांव | IFSC Code | Account No. |
|---|---|---|---|
| 1 | **AXIS BANK** | **UTIB0000134** | **915020055386875** |

- वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत इंटर्नशीप पूर्ण केल्याच्या सर्टिफिकेटची प्रत जोडणे आवश्यक आहे.
- ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce Exam. नंतर जाहीर करण्यात येतो त्या परीक्षेच्या दीक्षान्त अर्जासोबत Declaration of Result letter/Award letter ची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे. (उदा. M.Phil/Ph.D etc.) पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्यांचे दीक्षान्त अर्ज 30 नोव्हेबर 2018 पर्यंत रू 850/— शुल्काने स्वीकारले जातील.
- श्रेणीसुधार परीक्षेस बसून ज्यांचा निकालात श्रेणीसुधार झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी करताना दीक्षान्त अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे. श्रेणी सुधारणा झाली नसलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी आपला पूर्ण पत्ता बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा. चुकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार पोहचू शकला नाही तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही
- दीक्षान्त समारंभापूर्वी यादी विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.
- **अपु—या अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

दीक्षान्त विभाग

दिः 10/08/2018

**श्री महेश काकडे**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# विभागीय क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मंडलिक कॉलेजकडे

**मुरगूड / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर विभागीय क्रीडा स्पर्धेचे यजमानपद यावर्षी मुरगूडच्या सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयास मिळाले. २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात २१ (पुरुष व महिला) स्पर्धांचा सहभाग असून महाविद्यालयात या स्पर्धांचे नेटके नियोजन करण्यासाठी बैठक झाली. मंडलिक महाविद्यालयात झालेल्या बैठक स्पर्धा अध्यक्ष प्राचार्य अर्जुन कुंभार, स्पर्धा सचिव प्रा. शिवाजी पोवार यांच्या संयोजनाखाली पार पडली.

प्रा. पोवार यांनी वर्षभर होणाऱ्या स्पर्धांचा धावता आढावा घेतला. कोल्हापूर विभागीय स्पर्धेची पहिली सभा शुक्रवार, १० ऑगस्ट रोजी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या दादोबा मंडलिक सभागृहात होणार आहे. पहिली सभा व वर्षभरातील स्पर्धा यासंदर्भात महाविद्यालयातील विविध समित्यावर प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सभेस उपप्राचार्य डॉ. शिवाजीराव होडगे, कला विभागप्रमुख डॉ. ए. जी. मगदूम, प्राध्यापक व प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

# डॉ. मगदूममध्ये प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे स्वागत

**जयसिंगपूर / प्रतिनिधी :**
येथील डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये २०१८-१९ या वर्षी प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन विजय मगदूम होते. तसेच शिवाजी विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, संस्थेच्या व्हाईस चेअरपर्सन अॅड. सोनाली मगदूम, संस्थेचे विश्वस्त प्रणव मगदूम व महाविद्यालयाचे प्राचार्य व शिवाजी विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. एस. एच. सावंत यांची उपस्थिती होती.

डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, आयुष्यात कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी नियोजनबद्ध कठोर परिश्रमाला पर्याय नाही. स्वतःमधील कमकुवत गोष्टीही माहीत असणे आवश्यक आहे. त्यानंतर बलस्थाने आणखी बलशाली करणे व कमकुवतपणा बलस्थानामध्ये बदलणे यातून आपल्याला हवी ती गोष्ट आपण साध्य करू शकतो.



**जयसिंगपूर : कार्यक्रमात डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करताना विजय मगदूम. शेजारी अॅड.सोनाली मगदूम, प्राचार्य सावंत आदी.**

विजय मगदूम यांनी संस्थेच्या अभिमानास्पद वाटचालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. व्हाईस चेअरपर्सन अॅड. सोनाली मगदूम यांनी महाविद्यालयातील अनुभवी प्राध्यापक व इतर कर्मचाऱ्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करून येथील सोयीसुविधांचा उपयोग करून घेऊन विद्यार्थ्यांनी चांगले करिअर घडवावे, असे सांगितले. प्रा. एम. बी. भिलवडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. ए. एम. मोरे यांनी केले. डीन अॅकॅडेमिक्स प्रा. ए. एम. नानिवडेकर यांनी आभार मानले. डॉ. जी. एम. मालू, डीन आर. अॅण्ड डी. डॉ. डी. बी. उंडे, प्रा. पी. पी. पाटील व एस. बी. कोळेकर सर्व विभाग प्रमुख सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.